# जाहिर ई- निविदा

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे अधिपत्याखालील सर्व शाखा, ७ पोलीस उपविभागीय कार्यालये व २९ पोलीस स्टेशन करीता संगणक, प्रिंटर व लॅपटॉप करीताचे द्विवार्षिक देखभाल व दुरुस्ती सुट्टे भागासह करार करण्यासाठी अधिकृत पुरवठादारांकडून **संगणक, प्रिंटर व लॅपटॉप** करीता त्या-त्या सयंत्राच्या व वस्तूंच्या इच्छुक पुरवठा धारकांकडून स्वतंत्ररित्या वेगवेगळया निविदा स्विकृतीच्या दिनांकापासून २ वर्ष कालावधीकरीता, सिलबंद ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा E-Tender पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ₹१,०००/- online भरणा करुन दि. ०६/०८/२०२१ ते दि. १४/०८/२०२१ पर्यंत download करता येतील. निविदा कराराची संपूर्ण माहीती, अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर तसेच www.puneruralpolice.gov.in या वेबसाईटवर फक्त पाहण्यास उपलब्ध आहेत.

पुणे
दिनांक :- ०६/०८/२०२१

०३/०८/२१

(डॉ. अभिनव देशमुख) भापोसे
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण

३. **सेवा संविदा करारानुसार सुट्टे भागासह सर्व साहित्याची देखभाल / दुरुस्ती करुन संगणक प्रणाली संबधित पोलीस ठाणी व उपविभागीय कार्यालये यांच्या जिल्ह्यामधील सर्व ठिकाणी समक्ष जाऊन उत्तम स्थितीत कार्यरत ठेवणे बंधनकारक राहील.**

४. पुणे ग्रामीण पोलीस विभागाचे अखत्यारीतील संगणक नेटवर्कींग (Lan) साहीत्य उदा.मॉडेम, राऊटर, लॅन केबल चांगल्या स्थितीत ठेवून नेटवर्क सुस्थितीत कार्यरत ठेवणे.

५. **दुरुस्तीपुर्व देखभाल :-** निवीदा धारकास (ठेकेदारास) वार्षिक करार कालावधीत मासिक तसेच नियमित दुरुस्तीपूर्व देखभाल संबधित पोलीस ठाणी व उपविभागीय कार्यालये यांच्या जिल्ह्यामधील सर्व ठिकाणी समक्ष जाऊन करणे बंधनकारक राहील. मासिक देखभाल दुरुस्तीचे सर्व पोलीस ठाणी व उपविभागीय कार्यालये यांचे व्हिजीट रिपोर्ट असल्याशिवाय देयके पारीत केली जाणार नाहीत. **(दर महीन्याला एक वेळ सर्व पोलीस ठाणी व उपविभागीय कार्यालये यांना दुरुस्तीपूर्व देखभालीसाठी समक्ष भेट देणे बंधनकारक आहे.)**

६. **मुळ सुट्टे भाग बदलणेविषयी :-** संगणक, प्रिंटर इ. सहसामुग्रीचे नादुरुस्त झालेले मुळ सुट्टे भाग बदलताना यंत्रसामुग्रीचे मुळ उत्पादकाकडील (OEM) बिल / टॅक्स इन्व्हाईस / कॅश मेमो सादर करावा लागेल. जर यंत्रसामुग्रीचे मूळ उत्पादक कंपनीचे (OEM)चे मेक ऐवजी दुसरे सुट्टेभाग वापरण्यात आल्यास अशा परिस्थितीत वार्षिक सेवा संविदा करार संपुष्टात येईल व सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल.

७. **उशीराने केलेल्या कामाची भरपाई रक्कम :-** नादुरुस्त संगणक सहसामुग्रीचे दुरुस्ती बाबत कळविले नंतर वेळेचे आत उदा. ४ तासांचे आत दुरुस्तीसाठी हजर न झाल्यास वार्षिक सेवा संविदा कराराच्या प्रती दिवसाचे रक्कमेच्या ०.५% एवढी रक्कम भरपाई म्हणून वसूल करण्यात येईल. जी जास्तीत जास्त एकूण वार्षिक सेवा संविदा कराराच्या ५% एवढी राहील. वारंवार हलगर्जी पणा केल्यास वार्षिक सेवा संविदा करार संपुष्टात येईल व सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल.

८. संगणक, प्रिंटर स्कॅनर इ. संबंधात दुरुस्तीस वेळ लागणार असल्यास ४ तासांचे आत आपाती (दुसरा तात्पुरता) संगणक, प्रिंटर, स्कॅनर पुरवून १२ तासांचे आत (कार्यालयीन वेळेत) समस्या दूर करावी.

९. संगणकात योग्य ऑपरेटींग सिस्टीम व इतर आवश्यक सॉप्टवेअर लोड आहे किंवा नाही याची खात्री करणे तसेच अॅन्टी व्हायरस सॉप्टवेअर अपडेट ठेवणे याबाबतची जबाबदारी निविदा धारकाची राहील. सदर सेवा संविदा काळामध्ये संगणकामध्ये अद्यावत सॉफ्टवेअर गरजेनुसार लोड करणे व सॉफ़्टवेअर बाबत काही तक्रार आल्यास त्याचे सुध्दा निवारण संबधित संगणक ज्याठिकाणी आहे त्याठिकाणी जिल्हाभर जाऊन तात्काळ करावे लागेल त्यासाठी कोणताही अतिरिक्त मोबदला देण्यात येणार नाही.

१०. सेवा संविदा धारकास सुट्टेभागासहीत सर्व संगणक सहसामुग्रीचे साहित्याची तसेच नेट वर्कींग साहित्याची सेवा पुरवावी लागेल.

११. बदललेले सुट्टे भाग मूळ प्रतीचे अथवा त्यापेक्षा चांगल्या प्रतीचे राहतील याबाबत खात्री करुन पुरवावे त्यापोटी लागणारा अतिरिक्त खर्च पुरवठादारास करावा लागेल.

१२. एखाद्या परिस्थितीत मूळ सुट्टा भाग उपलब्ध न झाल्यास सेवाकरार धारक यंत्रसामुग्रीच्या अधिकृत प्रतिनिधीस संपर्क साधून सदर सुट्टया भागाच्या बरोबरीचा अथवा त्यापेक्षा चांगल्या क्षमतेचा भाग वापरुन दुरुस्ती करेल. उदा. ५०० जीबी हार्ड डीस्क उपलब्ध नसेल तर १ टीबी विनामोबदला बदलून द्यावी लागेल.

१३. सुट्टया भागाशिवायच्या (Non-Comprehensive) निविदा वार्षिक सेवा संविदा कराराचे वेळी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१४. सुट्टया भागाच्या अनुपलब्धतेमुळे दुरुस्ती शक्य नाही, अशी सबब सांगता येणार नाही. जर सुट्टेभाग मिळणे अशक्य असल्यास निविदा धारकास / पुरवठाधारकास स्वखर्चाने यंत्रणा अपग्रेड करुन द्यावी लागेल.

१५. निविदा धारकास कोणत्याही वेळेस दुरुस्तीचे वेळी सुट्टे पार्ट बदलण्याचे झाल्यास दुरुस्तीकरीता वेळोवेळी सर्वसाधारणत: लागणा-या आवश्यक त्या साहित्याचा पुरेशा साठा कायमस्वरुपी ठेवावा लागेल.

१६. या कार्यालयाचे अधिकृत अधिकाऱ्यांनी देखभाल दुरुस्ती बाबत समाधानकारक अहवाल देऊन स्वाक्षरी केल्यानंतरच देयके पारीत केली जातील.

१७.**निवासी अभियंता पुरविणेबाबत:-** वार्षिक सेवा संविदा करार धारकास करार कालावधीमध्ये पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये एकूण ३ संगणक तज्ञ (Computer Engineer) पूर्ण वेळ अर्थात निवासी अभियंता (Residential Engineer) पुरवावे लागतील. त्यामधील १ संगणक तज्ञ पोलीस अधीक्षक कार्यालयात सर्व कार्यालयीन दिवसांत हजर ठेवणे बंधनकारक राहील. सदर तज्ञ, कार्यालयातील व स्थानिक शाखांतील संगणक यंत्र सामुग्रीचे कार्य सुरळीत चालू ठेवण्याची दक्षता घेतील. तसेच गरज लागल्यास एका पेक्षा जास्त संगणक तज्ञ हजर ठेवावे लागतील. नियंत्रण कक्ष, बिनतारी संदेश विभाग, जिल्हा विशेष शाखा व आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांना कार्यालयीन दिवस व वेळ सोडून **२४ तास ३६५ दिवस सेवा पुरवावी लागेल.**

त्याचबरोबर १ संगणक तज्ञ अपर पोलीस अधीक्षक, बारामती कार्यालय, बारामती येथे त्यांच्या अखत्यारीतील सर्व पोलीस ठाणी, व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये यांच्या संगणक व प्रिंटर दुरुस्तीसाठी नेमावा लागेल. तसेच १ संगणक तज्ञ अपर पोलीस अधीक्षक, पुणे यांच्या अखत्यारीतील सर्व पोलीस ठाणी, व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये यांच्या संगणक व प्रिंटर दुरुस्तीसाठी नेमावा लागेल. **असे एकुण ३ संगणक तज्ञ पुर्ण वेळ अर्थात निवासी अभियंता म्हणून पुरवावे लागतील.**

१८. निविदा धारकाने संगणक देखभाल दुरुस्ती/ दुरुस्ती करिता संगणक प्रिंटर यांचे कार्यालयाचे बाहेर स्थानांतर करणे वगैरे बाबींसाठी खालील नमुन्यात नोंदवही / स्थानांतर नोंदवही ठेवणे बंधनकारक राहील. दुरुस्ती/ दुरुस्ती करिता स्थानांतर नोंदवही खालील रकान्यात ठेवावी लागेल. कोणतीही वस्तू कार्यालयातून बाहेर नेल्यावर जास्तीत जास्त २ दिवसात दुरुस्त करुन परत द्यावी लागेल.

Inventory / Movement Register

| Sr.No. | Inventary number | Make & Model of computer | Sr.No. | Movement | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Taken for repairs | | Returned after repairs | |
| | | | | Date | Time | Date | Time |
| १ | | | | | | | |

Maintenance register (उदा.)

| Sr.No. | Inventory number | Date of Preventive maintenance | Date of Corrective maintenance | Name of Engineer | Spare parts used. | Nature of fault |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | SPPNR-०१ | ----- | | | Nil | |
| २ | SPPNR-०२ | | ----- | | RAM | |

**क) कराराच्या मुख्य अटी व शर्ती -**

१. कराराचा कालावधी हा ०२ वर्षांचा राहील. समाधानकारक सेवा न दिल्यास करार कालावधीमध्ये सदर करार केंव्हाही रद्द करण्याचा अधिकार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखून ठेवला आहे.

२. पुणे ग्रामीण पोलीस आस्थापनेवर असलेले सर्व संगणक व प्रिंटर्स आहे तसे आणि आहे तिथे या प्रमाणेच दुरुस्त करावे लागतील. त्यासाठी जाण्या येण्याचे व इतर कुठल्याही प्रकारचे खर्च पुणे ग्रामीण पोलीस यांचे तर्फे देण्यात येणार नाही. (सर्व पोलीस ठाणी व उपविभागीय कार्यालय यांचे पत्ते व संगणक व प्रिंटर्स ची संख्या सोबत परिशिष्ट क्रं १ मध्ये जोडली आहे.)

३. निविदा मिळविणा-या संस्थेने दर महीन्याला १५ तारखेच्या आत सर्व पोलीस ठाणी आणि उपविभागीय कार्यालये यांना भेटी देऊन तेथील संगणक व प्रिंटर्स दुरुस्त करावेत व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

४. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या आस्थापनेवर असलेले कोणत्याही पोलीस ठाणे अगर उपविभागीय कार्यालये यामधून कितीही वेळेस तक्रार प्राप्त झालेस निविदाकारास तेथे Service Engineer योग्य त्या स्पेअर पार्टसह ४ तासांचे आत रवाना करावा लागेल.

५. या कार्यालयास न्युनतम दराची निविदा मान्य करण्याचे बंधन असणार नाही. कार्यालयाच्या कामकाजाच्या हितासाठी अन्य यथोचित निविदा मंजूर करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

६. कार्यालयामध्ये पूर्वी समाधानकारकपणे काम केलेल्या कंपनीने निविदेद्वारे प्राप्त झालेल्या न्यूनतम दरास काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजूर करण्याचा अधिकार कार्यालय राखून ठेवत आहे.

७. **निविदेमधील सर्व काम हे या कार्यालयाच्या कामकाजाच्या हितासाठी एकाच पात्र निविदाधारकास निविदेमधील न्यूनतम दराने व एकवट पध्दतीने देण्यात येईल. असे करताना पुर्व अनुभव व गुणवत्ता यांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच कामाचे तुकडे करुन काम वेगवेगळ्या निविदाकारांना देण्यात येणार नाही.**

८. **दुरुस्ती व देखभाली बाबत :-** दुरुस्तीकरिता केव्हाही व कितीही वेळा दूरध्वनी / भ्रमणध्वनीद्वारे बोलावले / कळविले नंतर चार तासांचे आत दुरुस्तीचे ठिकाणी जाऊन दुरुस्ती करुन द्यावी लागेल. सर्व प्रकारच्या संगणक सहसामुग्रीचे नादुरुस्त झालेले सुट्टे भाग देखभाल कराराचे खर्चात दुरुस्ती / बदलून द्यावे लागतील. उदा. प्लास्टीकचे भाग, प्रिंटर बेल्ट, प्रिंटर सॉकेट, स्कॅनर लॅम्प, लॉजीक कार्ड, प्रिंट हेड ट्रे, डेसी व्हील, रोलर, ट्रॅ ॲन्ड डोअर, ट्रान्सपरसी फिल्म, सिल्ड मॅग्नेटीक मेडीया प्लास्टीक कव्हर, नॉब ट्रॅक्टर, रॉड हार्डडिस्क, फ्युजर असेम्ब्ली, प्रिंट नॉब, ऑनलाईन बटन गिअर, सीपीयु, मदरबोर्ड FDD, DVD, HDD, RAM, SMPS, मॉनिटर पिक्चर टयुब, इ. तसेच प्रिंटर टोनर कार्टरीज रिफीलींग करणे, प्रिंट रिबन पुरवठा करणे.

९. **टोनर रिफ़िलिंग-** टोनर रिफ़िलिंग साठी पोलीस अधीक्षक कार्यालय व त्याच्या सर्व शाखा यांना टोनर रिफ़िलिंगसाठी पूर्ण वेळ एक तंत्रज्ञ नियुक्त करणे गरजेचे आहे. तसेच पोलीस ठाणी आणि उपविभागीय कार्यालये यांच्या आवश्यकते प्रमाणे व मागणीनुसार टोनर रिफ़िलिंग त्या त्या ठिकाणी निविदाकार कंपनीने स्वतःच्या खर्चाने जाऊन करणे गरजेचे आहे. टोनर रिफ़िलिंग केल्या नंतर येणारी प्रत ही सुस्पष्ट असली पाहीजे तरच बिल अदा करण्यात येईल.

१०. **मुळ सुट्टे भाग बदलणेविषयी :-** संगणक, प्रिंटर इ. सहसामुग्रीचे नादुरुस्त झालेले मूळ सुट्टे भाग बदलताना यंत्रसामुग्रीचे मूळ उत्पादकाकडील (OEM) बिल / टॅक्स इन्व्हाईस / कॅश मेमो सादर करावा लागेल. जर यंत्रसामुग्रीचे मूळ उत्पादक कंपनीचे (OEM)चे मेक ऐवजी दुसरे सुट्टेभाग वापरण्यात आल्यास अशा परिस्थितीत वार्षिक सेवा संविदा करार संपुष्टात येईल व सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल.

११. **टोनर कार्टेज पुरवठ्या विषयी :-** पोलीस अधीक्षक कार्यालय, त्यांच्या सर्व अधिनस्त शाखा, पोलीस ठाणी व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यलये यांना वारंवार नवीन टोनर कार्टेज पुरवठ्याची गरज निर्माण होते. त्यासाठी पुरविण्यात येणारे टोनर कार्टेज हे ओरिजिनल असावेत. त्यासाठी संबंधित कंपनीचे पुरवठा प्रमाणपत्र (Supply Order) या कार्यालयास सादर करावी लागेल.

१२. **उशिराने केलेल्या कामाची भरपाई रक्कम :-** नादुरुस्त संगणक सहसामुग्रीचे दुरुस्ती बाबत कळविले नंतर वेळेचे आत उदा. ४ तासांचे आत दुरुस्तीसाठी हजर न झाल्यास वार्षिक सेवा संविदा कराराच्या प्रति दिवसाचे रक्कमेच्या ०.५% एवढी रक्कम भरपाई म्हणून वसूल करण्यात येईल. जी जास्तीत जास्त एकूण वार्षिक सेवा संविदा कराराच्या ५% एवढी राहील. तसेच पोलीस ठाणी व उपविभागीय कार्यालये हे तालुका स्तरावर असलेमुळे त्याठिकाणी दुरुस्ती बाबत किंवा टोनर रिफ़िलिंग बाबत कळविल्यास १२ तासात हजर होणे गरजेचे आहे अन्यथा प्रत्येक दिवसासाठी ₹ १,०००/- दंड आकारण्यात येईल, तसेच वारंवार उशीर केल्यास करार रद्द करण्यात येईल.

१३. मंजूर निविदाकार कंपनीस कार्यालयाच्या कामाच्या गरजेनुसार बदली संगणक / प्रिंटर्स (Standby) निविदा मंजूर झाल्या बरोबर या कार्यालयामध्ये द्यावे लागतील. त्याची संख्या खालील प्रमाणे राहील ः

a. संगणक - ५ नग
b. मॉनिटर - ५ नग
c. प्रिंटर - ५ नग (टोनर सह)
d. मोडेम BSNL करीता - ०२ नग
e. टोनर - १० नग.

१४. मंजूर निविदाकारास मंजूर निविदा रकमेच्या ५% अनामत रक्कम म्हणुन धनाकर्षाने (Demanad Draft) किंवा बॅक गॅरंटी म्हणून कराराच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत जमा करावी लागेल.

१५. मंजूर निविदाकाराच्या देयकामधून सरकारी नियमाप्रमांणे २% TDS व २% GST असे एकूण ४% कपात केले जाईल.

**१६. सध्या संपूर्ण देशामध्ये कोविड-१९ या विषाणूच्या संसर्गजन्य रोगामुळे आर्थिक व्यवस्थेवर खूप मोठा परिणाम झालेला आहे. त्यामुळे शासनाकडून वित्तीय वर्ष २०२१-२०२२ मध्ये कमी प्रमाणात / विलंबाने अनुदान प्राप्त होण्याची शक्यता आहे. सबब सेवा पुरवठ्याची देयके प्रलंबित राहू शकतात. त्यामुळे देयके वेळेत अदा झाली नाहीत, तरीही वस्तू व सेवा पुरवठा बंद करता येणार नाही.**

१७. पुणे ग्रामीण पोलीस हे कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे तसेच वर्षाचे ३६५ दिवस व २४ तास जनतेची सेवा करीत असल्यामुळे निविदाकार कंपनीस सुध्दा आपली सेवा ३६५ दिवस व २४ तास या पध्दतीने द्यावी लागेल. कार्यालयीन वेळ व कार्यालयीन कामकाजाचे तास या पध्दतीने सेवा देता येणार नाही.

**१८. पुणे ग्रामीण पोलीस हे कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे अचानकपणे ब-याच वस्तुची गरज भासते. त्याच बरोबर तातडीने सेवा मिळणे व अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता लागू शकत असल्याने निविदाकार कंपनी ही पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये नोंदणीकृत असावी व त्यांचे मुख्य कार्यालय हे पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये असावे ही या कराराची एक प्रमुख अट आहे.**

**१९. निविदा प्रक्रियेविषयी कोणतीही शंका असल्यास निविदापूर्व बैठकीमध्ये उपस्थित करावी. निविदा पूर्व बैठकीस अनुपस्थित असलेल्या निविदाकारास कोणतीही शंका उपस्थित करण्याचा अधिकार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.**

२०. या निविदेतील कोणतीही अट रद्द करण्याचा / शिथील करण्याचा किंवा संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अथवा पुढे ढकलण्याचा संपूर्ण अधिकार मा. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखून ठेवला आहे.

ड) **निविदा दाखल करण्याची पध्दत -**

१. सदर निविदा ही online पध्दतीने e-tender द्वारा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दोन लिफ़िफ़ा पध्दतीने भराव्यात. तसेच सदर निविदा www.puneruralpolice.gov.in या वेब पोर्टल वर फ़क्त download करण्यासाठी उपलब्ध आहे. सदर निविदार ₹ १,०००/- (विना परतावा) चा भरणा online करुन download कराव्यात. ₹ १,०००/- चा भरणा न करता भरलेल्या निविदा पात्र ठरणार नाहीत. तसेच निविदा बयाणा रक्कम ₹ १०,०००/- भरणे गरजेचे आहे. निविदा बयाणा रक्कम सूट अनुज्ञेय नाही.

२. **लिफ़ाफ़ा क्रं. १ मध्ये तांत्रिक** माहीती खालील प्रमाणे देण्यात यावी -

**निविदा कारांनी सोबत जोडायची कागदपत्रे**

a. निविदाकार कंपनीचे पूर्ण नाव व पत्ता, दूरध्वनी सह
b. निविदाकार कंपनीचे मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे पूर्ण नाव व पत्ते दुरध्वनीसह
c. निविदा फ़ी रक्कम ₹ १,०००/- online पध्दतीने भरल्याची पावती.
d. निविदाकार कंपनीचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (Company incorporation / Shop Act)
e. निविदाकार कंपनीचे / मालकाचे PAN Card / TAN Card.
f. निविदाकार कंपनीचे मागील ३ वर्षांचे Income Tax Return.
g. निविदाकार कंपनीचे GST Registration Certificate.
h. संगणक व प्रिंटर्स च्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीचे शासकीय व निमशासकीय संस्थेमधील कामाचा अनुभव आवश्यक त्या कागदपत्रांसह. (सोबत Work order / Purchase Order जोडणे बंधनकारक)
i. **निविदाकार कंपनीने HP/Samsung/Epson/Brother/Dell/Acer ह्या पैकी एका कंपनीचे अधिकृत सेवा पुरवठादार म्हणजेच Authorised Service Provider Certificate देणे बंधनकारक आहे.**
j. निविदाकार कंपनीचे एकूण Technical Manpower संबंधी माहिती देणे बंधनकारक आहे. (किमान ५ Technical कामगार असलेबाबत)
k. निविदाकार कंपनी किंवा त्यांचे मालक / संचालक / भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्यावर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फ़सवणुकीची / गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालू / प्रलंबित नसली पाहीजे. तसेच निविदाकार कंपनीचा समावेश सरकारी काळ्या यादीत नसला पाहीजे. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र ₹ १०० च्या स्टॅम्प पेपर वर देणे बंधनकारक आहे. (सोबत नमुना परिशिष्ट - २)
l. निविदाकार कंपनीचे मालक / संचालक / भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणा-या स्वतंत्र अथवा भागीदारीमध्ये वेग वेगळ्या कंपन्या रजिस्टर असल्यास सदर कंपनी व मूळ कंपनी अशा दोन किंवा जास्त निविदा सादर करता येणार नाहीत. तसेच अशा प्रकारच्या दोन किंवा जास्त निविदा एकाच वेळी व एकाच निविदेसाठी इतर कोणत्याही शासकीय कार्यालयात सादर केल्या असतील व तसे करुन मूळ कंपनीच्या नावावर काम घेतले असेल किंवा नसेल, अशा कंपन्यांना साखळी करुन (Ring) निविदा प्रक्रिया केली असे संबोधले जाईल व अशा कंपन्यांच्या निविदा रद्द करण्यात येतील. निविदा सादर करणा-या सर्व निविदाकारांनी स्वतःचे प्रतिज्ञापत्र ₹. १००/- च्या मुद्रांकावर सोबत जोडलेल्या नमुण्या प्रमाणे देणे बंधन कारक आहे. (सोबत नमुना परिशिष्ट - ३)
m. निविदा बयाना रक्कम ₹ १०,०००/- चा online भरणा केल्याची पावती (Transaction ID / Online Receipt) जोडणे बंधनकारक आहे. निविदा बयाणा रक्कम सूट अनुज्ञेय नाही.

३. लिफ़ाफ़ा क्रं. २ व्यावसायिक

<u>**सदर दर हे www.mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर देण्यात आलेल्या Bill of Quantity (BoQ) या Excel Format मधील File मध्ये असले प्रमाणे भरण्यात यावेत.**</u>

०४. उपरोक्त नमूद केलेल्या पध्दतीने सादर न झालेल्या निविदा नाकारण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

०५. निविदेतील प्रत्येक पान हे निविदाकार कंपनीने अधिकृत केलेल्या अधिका-याने स्वयंसाक्षांकित करणे आवश्यक राहील.

०६. ज्या निविदाकाराची तांत्रिक निविदा छाननी / खरेदी समितीने मंजूर केलेली असेल त्यांचीच व्यावसायिक निविदा (दरपत्रक) उघडण्यात येईल.

०७. निविदेसंदर्भातील सर्व निर्णय मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण हे घेतील व ते सर्व निविदाकारांवर बंधनकारक असतील.

०८. कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क तसेच कोणतेही कारण न देता सदर निविदा सूचना पुढे ढकलणे किंवा रद्द करणे याचे अधिकार मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखून ठेवले आहेत. तसेच अशा मंजूर किवा नामंजूर निविदे बाबत कोणतेही स्पष्टीकरण मा. पोलीस अधीक्षक हे इतर निविदाकारांना देणार नाहीत.

०९. अपात्र निविदाकारांची बयाना रक्कम, सर्व प्रक्रिया पूर्ण झालेनंतर online पध्दतीने परत करण्यात येईल.

१०. निविदेमधील दर हे संपूर्ण करार कालावधीसाठी बंधनकारक असतील. कोणत्याही कारणाने त्यामध्ये वाढ देण्यात येणार नाही.

११. कोणत्याही निविदेतील कोणतेही दर बाजारभावापेक्षा खूप जास्त किंवा खूप कमी असतील तर अशा निविदांचा विचार केला जाणार नाही. (वस्तुंच्या बाबतीत सदर दर हे MRP पेक्षा कमी असावेत) तसेच GeM Portal वरील दरांपेक्षा कमी असावेत.

१२. निविदेमधील सर्व दर हे सर्व प्रचलित करांसहीत असावेत.

१३. **पोलीस ठाणी व पोलीस अधीक्षक कार्यालय याठिकाणी बरेचसे संगणक व प्रिंटर्स देणगी प्राप्त आहेत. अशा संगणक व प्रिटर्स च्या संखेचा समावेश सेवा संविदा करारामध्ये नाही त्यांना सुध्दा करार कालावधीमध्ये मोफ़त सेवा द्यावी लागेल. त्याचा कोणताही अतिरिक्त चार्ज देण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी. ही या कराराची एक प्रमुख अट आहे.**

<u>**वरील प्रकारचे संगणक व प्रिंटर्स देखभाल व दुरुस्ती / टोनर रिफ़िलिंग / टोनर खरेदी यांचे दर देताना सदर वस्तुंची पाहणी निविदाकार कंपनीने स्वतःच्या खर्चाने या कार्यालयात येऊन किंवा संबंधित पोलीस स्टेशनला जाऊन करावी. ज्या निविदाकाराची तांत्रिक निविदा सर्व कागदपत्रांसह मंजुर होईल अशा निविदाकाराचीच व्यावसायिक निविदा उघडण्यात येईल याची नोंद घ्यावी.**</u>

इ) निविदा दाखल करणे / निविदा उघडणे याबाबतचा तपशील -

| | | |
|---|---|---|
| १. | निविदा मागविण्याचा दिनांक | दिनांक ०६ /०८/२०२१ ते १४ /०८/२०२१ |
| २. | निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १४ /०८/२०२१ संध्या १६.०० वाजे पर्यंत www.maharashtrateder.gov.in या website वर online पध्दतीने सादर कराव्यात. |
| ३. | निविदा पूर्व बैठक (Pre Bid Meeting) | दिनांक १० /०८/२०२१ संध्या १५.०० वाजता मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयात होईल. |
| ३. | निविदा उघडण्या दिनांक व वेळ | **तांत्रिक निविदा** - दिनांक १७ /०८/२०२१ रोजी सायं १८.०० वाजता हजर निविदाकार यांचे प्रतिनिधींसमोर online उघडण्यात येतील.<br>**व्यावसायिक निवीदा** - ज्या निविदाकारांच्या तांत्रिक निविदा मंजूर होतील, अशा निविदाकारांना व्यावसायिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ कळविली जाईल.<br>(दोन्ही निविदा online पध्दतीने उघडण्यात येतील.) |
| ४. | संपर्क अधिकारी | श्री ए. एच. अत्तार, वरिष्ठ लिपीक, प्रबंधक कक्ष, पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामिण पोलीस, चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे - ८<br>दूरध्वनी क्रं. ०९०४९०५९४४४ |

प्रस्तावित संगणक व प्रिंटर देखभाल व दुरुस्ती करारासंबंधी काही शंका असल्यास त्याच्या निराकरणासाठी पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयात उपरोक्त नमूद केलेल्या संपर्क अधिकारी यांचेशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा. तसेच E-Tender विषयी काही शंका असल्यास एनआयसीच्या १८००३०७०२२३२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

**ई-निविदा पध्दतीने निविदा भरताना काही अडचणी आल्यास (Internet सेवा बंद असणे / लाईट जाणे ई.) व त्यामुळे अपूर्ण निविदा भरली गेल्यास त्याला पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच अशा प्रकारच्या कोणत्याही समस्या निर्माण झाल्यास त्याची कोणतीही दखल घेतली जाणार नाही, याची सर्व निविदाकारांनी नोंद घ्यावी.**

०३/०८/२१

(डॉ. अभिनव देशमुख) भापोसे
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण

परिशिष्ट -१

उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व पोलीस स्टेशन यांची यादी खालील प्रमाणे -

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव |
|---|---|
| १ | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय (बारामती) |
| २ | अपर पोलीस अधीक्षक, बारामती |
| ३ | बारामती शहर पोलीस स्टेशन |
| ४ | बारामती तालुका पोलीस स्टेशन |
| ५ | इंदापूर पोलीस स्टेशन |
| ६ | वालचंदनगर पोलीस स्टेशन |
| ७ | वडगांव निबं ाळकर पोलीस स्टेशन |
| ८ | भिगवण पोलीस स्टेशन |
| ९ | उपविाभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, दौंड |
| १० | दौंड पोलीस स्टेशन |
| ११ | शिरुर पोलीस स्टेशन |
| १२ | शिक्रापूर पोलीस स्टेशन |
| १३ | यवत पोलीस स्टेशन |
| १४ | रांजणगाव पोलीस स्टेशन |
| १५ | उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, लोणावळा |
| १६ | लोणावळा शहर पोलीस स्टेशन |
| १७ | लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन |
| १८ | वडगांव मावळ पोलीस स्टेशन |
| १९ | कामशेत टाकवे पोलीस स्टेशन |
| २० | उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, हवेली |
| २१ | हवेली पोलीस स्टेशन |
| २२ | वेल्हा पोलीस स्टेशन |
| २३ | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, खेड |
| २४ | खेड पोलीस स्टेशन |
| २५ | घोडेगांव पोलीस स्टेशन |
| २६ | मंचर पोलीस स्टेशन |
| २७ | पौंड पोलीस स्टेशन |
| २८ | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय भोर |
| २९ | भोर पोलीस स्टेशन |
| ३० | जेजूरी पोलीस स्टेशन |
| ३२ | सासवड पोलीस स्टेशन |
| ३३ | राजगड पोलीस स्टेशन |
| ३४ | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय जुन्नर |
| ३५ | जुन्नर पोलीस स्टेशन |
| ३६ | नारायणगांव पोलीस स्टेशन |
| ३७ | ओतूर पोलीस स्टेशन |

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे अस्थापनेवर व अधिनिस्त पोलीस ठाणी व उपविभागिय कार्यालये यांचे कडे सध्या असलेले संगणक, लॅपटॉप व प्रिंटर यांचे विवरण व संख्या खालील प्रमाणे -

| एकूण संगणक | एकूण लॅपटॉप | एकूण प्रिंटर |
|---|---|---|
| ४५३ नग | ५५ नग | ३४२ नग |
| मेक - एच.पी. / डेल / एच.सी.एल. / एसर/ केबीएस / असेंब्ल्ड | मेक - डेल / एचपी / मायक्रोसॉफट | मेक- एच.पी. / कॅनन / ब्रदर / सॅमसंग / रिको / लेक्समार्क |

**टिप १ :-** वरिल प्रमाणे संगणक, लॅपटॉप व प्रिंटर्सची संख्या पोलीस ठाणे व सर्व शाखानुसार यादी आवश्यकते प्रमाणे उपलब्ध करुन दिली जाईल. त्याच प्रमाणे वरिल यादीमध्ये देणगी प्राप्त संगणक व प्रिंटर यांचा समावेश नाही. तरीही सदर देणगी प्राप्त संगणक व प्रिंटर यांना मोफ़त सेवा द्यावी लागेल.

**टिप २ :- संगणक व प्रिंटर्सची संख्या करार करताना अचूक मोजून दिली जाईल. करार करतेवेळी वरील प्रमाणे संख्या कमी जास्त झाली तरी निविदाकाराला दर वाढवून मिळणार नाही.**

**परिशिष्ट -२ (मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)**

**प्रतिज्ञापत्र (₹ १०० च्या मुद्रांकावर)**

मी / आम्ही ------------(मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता)-------------------------------- ----- पुणे ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालयामध्ये संगणक व प्रिंटर्स च्या सेवा संविदा कराराची निविदा भरत या ----------------(निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ------------ नावाने भरत आहोत. मी / आम्ही तसेच माझी कंपनी यांचे विरोधात कोणत्याही सरकारी कार्यालयामध्ये निविदा भरण्याच्या दिनांका रोजी पर्यंत कोणतीही गैरप्रकार, अफ़रातफ़र, गैरव्यवहार, फ़सवणुक तसेच भ्रष्टाचार या विषयी कोणतीही चौकशी चालु नाही किंवा प्रलंबित नाही. तसेच अशा प्रकारची कोणतीही चौकशी माझे / आमचे जवळचे नातेवाईक (आई / वडील / बायको / नवरा / भाऊ / बहीण) यांचे विरोधात सुध्दा चालु नाही.

सही

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक

**परिशिष्ट - ३ (मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)**

**प्रतिज्ञापत्र (₹ १०० च्या मुद्रांकावर)**

मी / आम्ही ------------(मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता)-------------------------------- ----- पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये संगणक व प्रिंटर्स च्या सेवा संविदा कराराची निविदा या ------ ----------(निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ------------ नावाने भरत आहोत. मी / आम्ही सदर कंपनीचे संचालक असून आमच्या संचालकांच्या जवळच्या नातेवाईक (मालक / संचालक व त्यांचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी) यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणाऱ्या स्वतंत्र अथवा भागीदारीमध्ये वेग वेगळ्या कंपन्या रजिस्टर आहेत / नाहीत. (असल्यास त्यांची नावे देण्यात यावीत.)

तसेच सदर दोन किंवा त्यापेक्षा जास्त असणा-या कंपन्यांनी मिळुन कोणत्याही एका शासकिय निविदा प्रक्रियेमध्ये एकत्र सहभाग नोंदविलेला नाही. तसेच अशा प्रकारचे कोणतेही शासकीय काम घेतलेले नाही. अशा प्रकारची तक्रार आढळुन आल्यास मला व माझ्या कंपनीला सदर निविदा प्रक्रियेमधून रद्द करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

सही

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक

**लखोटा क्रं. १ (तांत्रिक) उघडण्याबाबत -**

लखोटा क्रं. १ (तांत्रिक) हा दिनांक ३०/१०/२०१५ व दिनांक ०१/१२/२०१६ रोजीच्या उद्योग व उर्जा विभागाकडील शासन निर्णयातील सूचनेनुसार गठीत केलेल्या समितीसमोर E-Tender प्रणाली मार्फत उघडण्यात येईल. तसेच त्यासाठी निविदाकारांना आमंत्रित केले जाईल. निविदाकार स्वतः किंवा त्यांचे प्रतिनिधी सदर वेळी उपस्थित राहू शकतात. जे निविदाकार उपस्थित राहणार नाहीत त्यांना सदर प्रक्रियेमध्ये कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच लखोटा क्रं १ (तांत्रिक) मधील सर्व कागदपत्रांची तपासणी समितीमार्फत केली जाईल. त्यासाठी गरज लागल्यास जास्त वेळ मागून घेण्यात येईल. कागदपत्रांची तपासणी निविदाकारांसमोरच करण्याचे बंधन समितीवर नसेल. समितीच्या वेळेनुसार व गरजेनुसार कागदपत्रांची छाननी व तपासणी केली जाईल तसेच त्याबाबतीत अंतिम निर्णय हे मा. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण हे समिती चे अध्यक्ष या नात्याने घेतील व तो निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल. समितीचा निर्णय यथावकाश सर्व निविदा धारकांना कळविण्यात येईल.

**निविदेचा वैधता कालावधी -**

निविदेचा वैधता कालावधी तांत्रिक लिफ़ाफ़ा उघडल्यानंतर किमान १२० दिवस असेल. १२० दिवसांपेक्षा कमी कालावधी दर्शविलेल्या निविदा नाकारण्यात येतील. तसेच सदर निविदा किमान दोन वर्षासाठी बंधनकारक असतील.

**निविदा प्रक्रियेबाबत अथवा निविदा सादर केलेल्या निविदाधारकांबाबत तक्रारीबाबत -**

निविदा प्रक्रियेमध्ये निविदा सादर केलेल्या निविदाधारकावर तक्रार दाखल करणा-या तक्रारधारकास ₹ ५०,०००/- इतकी अनामत रक्कम कार्यालयाकडे जमा करावी लागेल. जर तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास संबंधित तक्रारदाराची अनामत रक्कम परत करुन आरोप सिध्द झालेल्या निविदाधारकास निविदा प्रक्रियेमधून वगळण्यात येऊन त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. (उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/उद्योग-४ दिनांक ३० ऑक्टोबर २०१५ मधील ५.८.२ नुसार पा.क्र. ७६). त्याच प्रमाणे निविदा प्रक्रिये विषयी काही आक्षेप / तक्रार असल्यास फ़क्त निविदा सादर केलेल्या निविदाकारास (त्याने अनामत रक्कम भरली असल्यास) तक्रार करण्याचा अधिकार असेल. त्यासाठी सुध्दा संबधित तक्रारदाराने ₹ ५०,०००/- इतकी अनामत रक्कम कार्यालयाकडे जमा करावी लागेल.

**निविदेचे मुल्यमापन -**

१. गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत तांत्रिक लखोट्यातील कागदपत्रांची तपासणी केली जाईल.
२. निविदाधारकाचे पात्रतेचे सर्व निकष, निविदाधारकाची ऐपत, निविदा कालावधी पूर्ण करण्याची क्षमता याबाबतची छाननी निविदा धारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे समिती ठरवेल.
३. सदर निविदेचे मूल्यमापन करताना केवळ कमी दर हा निकष लागणार नाही. सक्षम सेवा पुरवठादार व पूर्व इतिहास लक्षात घेतला जाईल.
४. सदर निविदा देतेवेळी जिल्हा स्तरावर काम केलेल्या (Multi Location) निविदाधारकास प्राधान्य देण्यात येईल.
५. कामकाजाच्या सोयीसाठी सर्व काम एकाच निविदांकाराला एकवट पध्दतीने व न्युनतम दर तसेच निविदाधारकाची ऐपत, निविदा कालावधी पूर्ण करण्याची क्षमता, पूर्वानुभव आदी बाबींचा विचार करुन दिले जाईल. त्यासंदर्भात निर्णय करण्याचे सर्व अधिकार मा. पोलीस अधीक्षक यांनी राखून ठेवले आहेत.

६. निविदेमध्ये भरण्यात आलेले दर हे बाजरयोग्य असल्याची खात्री समिती करेल, तसेच अत्यंत कमी किंवा अत्यंत जास्त दर दिलेले असतील तर त्यांच्या निविदा अव्यवहार्य म्हणून नाकारल्या जातील. तसेच वस्तूंचे दर हे GeM Portal वरील दरांपेक्षा कमी असावे लागतील.

७. सदर निविदा ही BoQ पध्दतीने Online भरण्यात येणार आहे. त्यामुळे निविदेमधील प्रत्येक घटकाचे (Itemwise) स्वतंत्र मूल्यमापन न करता BoQ मधील एकूण रक्कम (Final Total) नुसार मुल्यमापन केले जाईल.

**भ्रष्ट, फ़सवणुक अथवा अव्यवहार्य सेवेबावत -**

भ्रष्ट, फ़सवणूक अथवा अव्यवहार्य सेवा असणाऱ्या तसेच उपरोक्त असलेले व सदरची माहिती या कार्यालयापासून लपवून ठेवलेल्याचे निदर्शनास आलेस सदर निविदाकाराची निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्यात येईल.

**निविदा प्रक्रियेबाबतचे स्पष्टीकरण -**

निविदा प्रक्रियेबाबत काही शंका अथवा तक्रारी असल्यास संबंधित निविदाकाराने अथवा निविदा भरु ईच्छिणाऱ्या निविदाकारांनी सदरची शंका अथवा तक्रार निविदा भरण्याच्या अंतिम दिनांक व वेळेपूर्वी किमान ०२ दिवस अगोदर लेखी स्वरुपात या कार्यालयाला सादर करावी. त्यानंतर आलेल्या कोणत्याही शंका अथवा तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

**निविदेमध्ये दर भरण्याविषयी -**

निविदा प्रकीयेमध्ये सहभागी होऊ ईच्छिणा-या निविदाकारांनी निविदेतील दर भरण्यापूर्वी या कार्यालयामध्ये समक्ष येऊन किंवा संबधित पोलीस स्टेशनला जाऊन वापरण्यात येणारे संगणक व प्रिंटर्स त्यांचा make, model इत्यादी बाबींची खात्री समक्ष करावी. तसेच दर भरण्याविषयी काही शंका असल्यास निविदापूर्व बैटकीमध्ये ती मांडावी. निविदापूर्व बैठकीस उपस्थित नसणा-या निविदाकारांस निविदे विषयी कोणतीही तक्रार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**महत्वाची सुचना - सदर पोलीस अधीक्षक कार्यालय हे कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे निविदा उघडणेची तारीख व वेळ कधीही बदलू शकते.**

03/08/21

(डॉ. अभिनव देशमुख) भापोसे
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.